# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ऋणमोचन (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील 'ब' वर्ग पर्यटन क्षेत्र व कोंडेश्वर (ता.जि.अमरावती) येथील विकास करणेबाबत

**(१) ११३३ (२३-१२-२०१४). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऋणमोचन (ता.भातकुली.जि.अमरावती) येथील 'ब' वर्ग पर्यटन क्षेत्र व कोंडेश्वर (ता.जि.अमरावती) येथील विकास करणेसाठी शासनाने कृती आराखडा करुन निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास कामे सुरु करण्यासाठी किती निधी मंजूर केला आहे, सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ शहराच्या अॅक्शन प्लॅनची (कृती आराखडा) मुदत संपली तरी नवीन नियोजन तयार करण्यात आले नसल्याबाबत

**(२) ५२०७ (०७-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहराच्या अॅक्शन प्लॅनची (कृती आराखडा) मुदत संपली तरी नवीन नियोजन तयार करण्यात आले नसून आजही यवतमाळचा विकास २३ वर्षापूर्वी तयार करण्यात आलेल्या अॅक्शन प्लॅननुसारच सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ शहराच्या विकासाची गती मंदावल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदेने विकास करण्यासाठी ॲक्शन प्लॅन तयार केला होता परंतु निधी अभावी दुर्लक्ष झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहराच्या विकासासाठी नविन ॲक्शन प्लॅन तयार करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६)** :(१) यवतमाळ नगर परिषदेचा विकास आराखडा दि.०८/०७/१९९८ अन्वये मंजूर झालेला आहे. या नंतर नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार मंजूर विकास आराखड्यात काही फेरबदल करण्यात आले होते त्यानुसार उपलब्ध निधीनुसार विकास कामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ब्रम्हपुरी नगरपरिषद (जि.चंद्रपूर) क्षेत्रात बगीचा व तलावांचे सौंदर्यीकरण करण्याबाबत

**(३) ५४३२ (०६-०७-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी नगरपरिषद क्षेत्रात एकही बगीचा नसल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळयासाठी एकही साधन नाही. लहान मुला-मुलींना खेळण्यासाठी कोणतेही साधन नसल्यामुळे नागरिकांना ब्रम्हपुरी परिसरात असलेल्या सर्वात मोठया बाराही तलावाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे अशी मागणी केलेली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने बाराही तलावाचे सौंदर्यीकरणासह बगीच्याचे बांधकाम करण्यात यावे, सदर तलावाच्या परिसरात विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाचे बांधकाम करण्यात यावे या विकासात्मक कामाची मागणी केली असता अद्यापही या कामांना मंजुरी प्राप्त झालेली नसल्याची माहिती दिनांक २० जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाराही तलावाचे सौंदर्यीकरण करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०१५ च्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाराही तलावाचे सौंदर्यीकरणाच्या बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) नगर परिषद क्षेत्रात बारई तलाव सर्व्हे नं. ५२२ आराजी ८.५३ हे आर ही जागा नगरपरिषद विकास योजना आराखड्यात पाण्याची बोडी (तलाव) म्हणून दर्शविलेली आहे. सदर जागा ही खाजगी मालकीची जागा आहे.

नगरपरिषदेकडून शेषनगर येथे असलेल्या खुल्या बगीच्याचे सौदर्यीकरणाचे काम निर्माणाधिन आहे.

---

**क्विक रीस्पॉन्स टीममध्ये महिला पोलीसांना प्रवेश नाकारण्यात येत असल्याबाबत**

**(४) ५५६० (०६-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती चिघळल्यास, ती हाताळण्यासाठी स्थापन केलेल्या क्विक रीस्पॉन्स टीममध्ये महिला पोलीसांना प्रवेश नाकारण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पथकातील समावेशासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण महिला पोलीसांना देण्याची व्यवस्था मुंबईतील फोर्स वन प्रशिक्षण केंद्रात नसल्याचे कारण देण्यात आले असल्याने महिला पोलीसांना संधी मिळत नाही हे पाहता शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) व (२) नाही. हे खरे नाही.

गृह विभागाच्या दि.३१.०८.२००९ च्या एसएसए-१००९/प्र.क्र.३७७/विशा-४ च्या शासन निर्णयान्वये जलद प्रतिसाद पथके स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

जलद प्रतिसाद पथके स्थापन करण्याचा उद्देश राज्यात फक्त कायदा व सुव्यवस्था राखणे असा नसून प्रामुख्याने दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी तसेच दहशतवादी हल्ल्यास प्रतिउत्तर देणे हा आहे.

तसेच संपुर्ण राज्यात या पथकामध्ये नेमणूक होण्यासाठी आज पर्यंत कोणीही महिला अधिकारी किंवा अंमलदार यांनी अर्ज केलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील अंबाळा तलावाचे सौंदर्यीकरण करण्याची मागणी**

**(५) १११०२ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील अंबाळा तलावाचे सौंदर्यीकरण करावी अशी मागणी विभागीय आयुक्तांकडे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१), (२) व (३) उपरोक्त प्रकरणी नगर परिषद रामटेक अंतर्गत सरोवर संवर्धन योजनेमधून अंबाळा तलावाचे सौंदर्यीकरण करण्याबाबत सर्वसाधारण सभा दि. २६/१२/२०१४ ठराव क्र. १९ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (D.P.R.) तयार करण्याबाबत नगर परिषदेकडून आदेश देण्यात आले असून सर्वेक्षण व अहवाल तयार करण्याची कार्यवाही नगर परिषद स्तरावरुन सुरु आहे.

---

### सोलापूर शहरातील आसरा चौक-विजापूर रस्ता नादुरुस्त असल्याबाबत

**(६) १३४७३ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील आसरा चौक-विजापूर रोड रस्ता नादुरुस्त असून त्याबाबत नागरिकांची अनेक वर्षापासून मागणी देखील आहे, या रस्त्यांचे दुरुस्तीकरण अथवा नुतनीकरण झाले नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) विद्‌यापिठ ते टाकळीनगर मंगल कार्यालय ते अत्तार लगी-विजापूर रोडपर्यंत विकास कामास मंजूरी मिळाली आहे. रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सोलापूर महानगरपालिकेच्या शहर हद्दवाढ भागात सुसज्ज रुग्णालय व अतिदक्षता विभाग नसल्याबाबत

**(७) १३४७९ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेच्या शहर हद्दवाढ भागात सुसज्ज रुग्णालय व अतिदक्षता विभाग नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित प्रकरणावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) अंशत: हे खरे आहे.

(२) हद्दवाढ परिसरात ६ आर.सी.एच केंद्रे स्थापित केले असून यापैकी ४ ठिकाणी प्राथमिक नागरी आरोग्य केंद्राच्या बांधकामास परवानगी मिळाली असून येथे हद्दवाढ भगातील नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर महापालिकेच्या खात्यावर मुख्य लेखापाल कार्यालयाकडील नोंदीनुसार**

**(८) १३८५८ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महापालिकेच्या खात्यावर दिनांक १ एप्रिल ते ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंतच्या कालावधीत मंडई विभागाने रुपये ४४ लाख, ८० हजार ३०९ इतकी रक्कम जमा केली मात्र मुख्य लेखापाल कार्यालयाकडील नोंदीनुसार फक्त ३६ लाख रुपये जमा असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

मंडई विभागाने दि. १ एप्रिल, ते ३१ डिसेंबर, २०१४ अखेरपर्यंत एकूण रु.४५,४८,८५६/- इतकी रक्कम जमा केली असून त्याबाबतच्या आवश्यक त्या नोंदी घेतलेल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने गणेश पेठ व्यापारी संकुलातील गाळे सिल केल्याबाबत**

**(९) १३८६० (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने गणेश पेठ व्यापारी संकुलातील ९१ पैकी ३० गाळे सिल केले आहेत, महानगरपालिकेच्या मालकीच्या या मोठ्या गाळ्यांमध्ये पोट भाडेकरु असल्याने ही कारवाई करण्यात आली तर वेगवेगळ्या भागातील एकूण १९ लहान गाळे सिल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदा ताबा असलेले अन्य २९३ गाळे सिल करण्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत महानगरपालिकाकडून तपासणी करण्यात येत आहे.

---

### राज्यातील कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीत शासनाच्या विविध सुविधा मिळण्याबाबत

**(१०) १६१५८ (११-०५-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीत शासनाच्या विविध सुविधा राबविणेबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात कोणत्या योजनांचा समावेश केला आहे तसेच राज्यातील असलेल्या कॅन्टोन्मेंट बोर्डापैकी देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डासाठी काही विकास कामांसाठी किती निधी खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) देवळाली कॅन्टोन्मेंट परिसरातील अनेक नागरी भागातील रस्ते सुरक्षिततेच्या कारणास्तव लष्करी विभागाकडून बंद करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही. परंतु डेअरी फार्म मार्ग व मिस्त्री मार्ग हे रस्ते प्रतिबंधित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील रेणुकानगर येथे दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(११) १६५३८ (११-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील रेणुकानगर येथील नागरिकांना गेल्या वीस वर्षापासून दूषीत पाण्याचा पुरवठा होत आहे, त्यामुळे या भागातील अबालवृध्दांना गंभीर आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे, मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) सदर ठिकाणी महानगरपालिकाकडून टॅंकरद्वारे पाणी पुरीवठा करण्यात येतो. तथापि अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांपासून पेन्शन मिळाली नसल्याबाबत**

**(१२) १६६८९ (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून पेन्शन मिळाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पेन्शनवर ज्यांचा उदरनिर्वाह आहे त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) अंशत: होय, महाराष्ट्र शासनाकडून नगरपरिषदांना कर्मचारी वेतनासाठी सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. शासनाकडून माहे फेब्रुवारी, २०१५ व मार्च, २०१५ या दोन महिन्यांचे सहाय्यक अनुदान दि.१५ एप्रिल, २०१५ रोजी प्राप्त झाले आहे. त्यामुळे कर्मचारी वेतन व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीवेतन दि.१५ एप्रिल, २०१५ रोजी अदा करणेत आले आहे.
(२) शासनाने कर्मचारी वेतनासाठी मिळणारे सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन दिल्यानंतर तात्काळ सेवानिवृत्तीवेतन अदा केलेले आहे.
(३) दि. १५ एप्रिल, २०१५ रोजी सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांना सेवानिवृततीवेतन अदा केले आहे.

---

**मुंबईतील लहान मुलांमध्ये दम्याच्या विकाराचे वाढते प्रमाण**

**(१३) १७०३० (१४-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेस्ट रिसर्च फाऊंडेशनने (सीआरएफ) २००३ मध्ये ५ ते ११ वर्षे वयोगटातील लहान मुलांच्या केलेल्या आरोग्य तपासणीत असे निदर्शनास आले होते की, २.५ टक्के लहान मुलांना दम्याचा विकार होता, सन २००८ मध्ये हे प्रमाण ५ टक्क्यावर गेले होते, तथापी सन २०१४ मध्ये केलेल्या तपासणीत दम्याचे प्रमाण २० टक्के झाले असून, ६ पैकी १ बालकास दमा असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत दमा होण्याची कोणती कारणे निदर्शनास आली व त्यावर कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) वातावरणातील धूळ, प्रदुषण यामुळे दमा हा एलर्जीक आजार होतो. तसेच ता अनुवांशिक देखील असतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत इयत्ता १ ली ते ५ वी तील विद्यार्थ्यांची दरवर्षी नियमित मोफत तपासणी करण्यात येत आहे. तसेच इतर आजाराप्रमाणे दम्याच्या संबंधीचे रोगी आढळल्यास त्या विद्यार्थ्यांना लगेच शालेय आरोग्य चिकित्सालयात किंवा महापालिका दवाखान्यात उपचाराकरिता पाठविण्यात येते.

---

**कोल्हापूर येथील रंकाळा तलावात मैलमिश्रित पाणी मिसळल्याने पाणी दुषित होऊन मासे मेल्याची घटना**

**(१४) १८५१२ (१०-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील रंकाळा तलावात मैलमिश्रित पाणी मिसळल्याने पाणी दुषित होऊन मासे मेल्याची घटना माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार रंकाळा तलावाचे पाणी प्रदुषित होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) रंकाळा तलावात मिसळणारे मैलमिश्रीत सांडपाण्याचे नाले राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या मोठ्या ड्रेनेज लाईनला जोडून तलावापासून वळविण्याचे काम महानगापालिकेने पूर्ण केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक शहरातील काशीमशहा टेकडीवर डांबरीकरणाच्या कामात निकृष्ट साहित्य वापरल्याबाबत**

**(१५) २३९५५ (११-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक शहरातील काशीमशहा टेकडीवर रुपये १६ लक्ष अंदाजपत्रकानुसार डांबरीकरणाचे काम ८ तासात पुर्ण केले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, नगरपरिषद रामटेक येथील अधिकारी व ठेकेदार यांचा संगनमताने सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचा कामास ८० एम.एम. ६ इंच काळीगिट्टी तसेच ४० एम.एम.४ इंच गिट्टीचा वापर करुन रस्त्याचा बेस तयार करणे हे अंदाजपत्रकात नमुद होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामाची चौकशी करुन संबंधीत अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) सदर कामाची चौकशी करुन मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे नसल्यामुळे काम रद्द करण्यात आले व त्यानंतर परिषदेच्या दि. २३/०६/२०१५ च्या सर्वसाधारण सभेमध्ये सदर विषय ठेवून फेर निविदा काढण्याचे ठरले त्यानुसार नगर परिषदेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पातूर नगरपरिषद अंतर्गत (जि.अकोला) शहरामध्ये कोटयावधीची**
**कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत**

**(१६) २६५३४ (११-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर नगरपरिषद अंतर्गत (जि.अकोला) शहरामध्ये कोटयावधीची कामे इस्टीमेट प्रमाणे होत नसून निकृष्ट दर्जाची होत असल्याने त्यांची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत नगरपरिषद पातूरचे उपाध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी अकोला यांनी संबंधितांना दि. १९/१२/२०१५ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय अहवाल सादर केला आहे.

---

**मुंबईत अकरा मॉलमध्ये आग विझवण्यासाठी यंत्रणाच नसल्याबाबत**

**(१७) ३२३५३ (२१-०१-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई बांद्रा, खार, सांताक्रुझ (पश्चिम) भागातील तब्बल ११ मॉलमध्ये अग्निरोधक यंत्रणाच नसल्याने अग्निशमन दलाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मॉल मालकांना नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन दलाचे नाहरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय मॉल मालकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाद्वारे कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

अग्निरोधक यंत्रणा नादुरुस्त असल्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

अग्निशमन दलामार्फत भोगवटा प्रमाणपत्राकरिता ना हरकत प्रमाणपत्र देताना अग्निशमन दलाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने तपासणी करुनच भोगवटा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने तपासणी दिले जाते.

ज्या मॉलला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले, अशा मॉलमध्ये अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(३) होय.

(४) चोकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी बृहनमुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंतर्गत संबंधितांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**क्षयाची लागण झाल्यास रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना दोन वर्षाची भरपगारी सुट्टी देण्याच्या घोषणाबाबत**

**(१८) ३२५१० (२१-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षयाची लागण झाल्यास रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना दोन वर्षाची भरपगारी सुट्टी देण्याची घोषणा मा.आरोग्य मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील क्षयरोग रुग्णालयातील २४ कर्मचाऱ्यांना क्षयरोगाची लागण झाली असून या कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्या पासून प्रशासनाकडून वेतन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकृती ठिक नसतानाही यातील काही कर्मचारी कामावर परतले असून त्यामुळे रुग्णालयात काम करणाऱ्या अन्य कर्मचाऱ्यांना ही क्षयरोगाचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) मुंबईतील क्षयरोग रुग्णालयातील २४ कर्मचाऱ्यांना क्षयरागाची लागण झाली हे खरे आहे.

तथापि, सदर कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यापासून महापालिका प्रशासनाकडून वेतन देण्यात आले नाही हे खरे नाही.

सदर कर्मचाऱ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियमावलीनुसार क्षयरोग रजा मंजूर करण्यात आली.

तसेच, महानगरपालिकेच्या दि.०५.११.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार, क्षयरोग रुग्णलयातील क्षयबाधित कर्मचाऱ्यांना विशेष क्षयरोग रजा व त्यानुसार वेतन देण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

क्षयबाधित कर्मचारी रुग्णांवर योग्य औषधोपचार करुन औषधोपचाराचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना महानगरपालिका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कामावर रुजू होण्यास पात्र ठरविल्यानंतरच कामावर हजर करुन घेण्यात येते.

तसेच, क्षयबाधित कर्मचाऱ्यांना कामावर रुजू केल्यानंतरही प्रत्येक तीन महिन्यांनंतर वैद्यकीय तपासणी करण्यात येते. त्यामुळे प्रकृती ठिक नसतांनाही काही कर्मचारी कामावर परतल्यास सदर रुग्णालयात काम करणाऱ्या अन्य कर्मचाऱ्यांना क्षयरोगाचा धोका होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांताक्रुझ (मुंबई) येथील विलिंग्डन कॉलनीच्या पुनर्विकासाच्या आड येणारी झाडे तोडून त्यांचे प्रत्यारोपण गोरेगांव आरे कॉलनी बाजूला करण्याबाबत**

**(१९) ३२७३९ (२१-०१-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ, मुंबई येथील विलिंग्डन कॉलनीच्या पुनर्विकासाच्या आड येणारी तेथील सुमारे १०० हून अधिक झाडे तोडून त्यांचे प्रत्यारोपण गोरेगांव आरे कॉलनी युनिट-१६ च्या बाजूला करण्याच्या अटीवर मुंबई महानगरपालिकेतर्फे संबंधित विकासकांस परवानगी देण्यात आलेली असतांना विकासकाने सदर अटीचे पालन न करता माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये सदर १०० झाडांपैकी केवळ ४० झाडांचे प्रत्यारोपण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे कॉलनीच्या संबंधित अधिका-यांनी युनिट क्र.१६ च्या बाजूला सदर झाडांच्या प्रत्यारोपणासाठी जागा उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर विकासकाने मृत झाडांची खोडे आणून टाकली असल्याची माहिती दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई शहरात नैसर्गिक वनसंपत्ती वाचविणे मुंबईकरांच्या जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असतांना व मुंबई शहर सध्या ग्लोबल वार्मिगच्या संकटात असतांना त्यातून मार्ग काढण्याकरिता जास्तीत जास्त झाले लावण्याची आवश्यकता असतांना अशा प्रकारे झाडे नष्ट करणा-या विकासकांवर मुंबई महानगरपालिकेने आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे वा कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६)** :(१) सांताक्रुझ (प) एस.व्ही रोड येथील वांद्रे गावचा न.भू.क्र. ४०१, ४०२, ४१५ ते ४३८ धारण करणाऱ्या भूभागावरील नियोजित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बाधित होणारी १०३ झाडे पुनर्रोपित करण्याची परवानगी वृक्ष प्राधिकरणाच्या दिनांक १९.१२.२०१४ च्या ठरावान्वये देण्यात आली होती.

त्यानुषंगाने आरे दुग्ध वसाहतीमधील युनिट नं. १६ च्या पूर्वेकडील व दक्षिणेकडील भागात वृक्ष प्राधिकरणाने दिलेल्या परवानगीनुसार दिनांक १७.०७.२०१५ पर्यंत विकासकाने सदर ठिकाणी १०२ झाडांचे पुनर्रोपण केले.
(२) हे खरे नाही.

विकासकाने दिनांक १७.०७.२०१५ पर्यंत १०२ जिवंत झाडांचे पुनर्रोपण केले आहे.
(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार कापण्यास परवानगी दिलेल्या प्रत्येक झाडांच्या मोबदल्यात ३ नवीन झाडे लावण्याची अट परवानगी पत्रातच नमूद करण्यात येते.

तथापि, सदर प्रकल्पांतर्गत बाधिक होणाऱ्या झाडांना कापण्याची परवानगी देण्यात आलेली नसून, १०३ झाडे पुनर्रोपित करण्याची परवानगी वृक्ष प्राधिकरणाच्या दिनांक १९.१२.२०१४ च्या ठराव क्रमांक १९१ अन्वये देयात आली होती आणि दिनांक १७.०७.२०१५ पर्यंत विकासकाने सदर १०३ झाडांपैकी १०२ झाडांचे पुनर्रोपण केले आहे.

तथापि, विहित कालावधीनंतर सदर पुनर्रोपित झाडांच्या तत्कालीन स्थितीचा पूर्ण आढावा घेऊन या पुनर्रोपित केलेल्या झाडांचा छायाचित्रासह प्रगती अहवाल विकासकाकडून घेण्यात येईल व त्याची सत्यता पडताळून परवानगी पत्रातील कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास विकासकास “महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष जतन व संवर्धन अधिनियम, १९७५” मधील तरतुदीनुसार विविध कार्यवाही महापालिकेमार्फत करण्यात येईल.

---

## मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये बसविण्यात आलेले हजारो वॉटर प्युरीफायर बंद असल्याबाबत

**(२०) ३३०१३ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये सन २०१३ मध्ये बसविण्यात आलेले हजारो वॉटर प्युरीफायर बंद असल्याने शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी शासनाकडून करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मुंबईतील महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकरणाची बृहन्मुंबई महानगपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेकच्या शाळांतील मुलांना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याबाबत महापालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

- १०० विद्यार्थ्यांकरिता एक जलशुध्दीकरण यंत्र हे परिणाम निश्चित करुन, सन २०१३ मध्ये एकूण २०२८ जलशुध्दीकरण यंत्रे बसविण्यात आली आहेत.
- सदर जलशुध्दीकरण यंत्रांच्या परिरक्षणाचा करार झाला असल्याने जी जलशुध्दीकरण यंत्रे नादुरुस्त होतात त्याबाबतची तक्रार तातडीने हेल्पलाईन नंबरवर कळविली जाते व जलशुध्दीकरण यंत्रे दुरुस्ती करुन घेतली जातात.
- जलशुध्दीकरण यंत्रे तातडीने दुरुस्त करुन न दिल्यास त्याबाबत कंत्राटदारास तसेच महापालिकेच्या ज्या कार्यालयाकडून जलशुध्दीकरण यंत्राच्या खरेदीची प्रिक्रिया पार पडली आहे त्यांना सुचित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुने नाशिक शहरातील जुने वाड्यांचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२१) ३४३०३ (२१-०१-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुने नाशिक शहरात मोठ्या प्रमाणावर जुने वाडे राहण्यास धोकादायक असल्याने या वाड्यात रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुने नाशिक शहरातील जुन्या वाड्यांचा पुनर्विकास करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत, वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण करणे ही निरंतर सुरु असणारी प्रक्रिया आहे. नाशिक शहरातील विविध विभागातील मोडकळीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेली बांध्‌कामे / धोकादायक इमारती, जुने वाडे, जीर्ण इमारीती इ. इमारतीचे नगररचना विभागामार्फत दरवर्षी सर्व्हेक्षण करण्यात येते. अशा आढळून आलेल्या धोकादायक इमारतीमध्ये तसेच सर्वेक्षणाव्यतिरिक्त तक्रार अर्जद्वारे निदर्शनास आलेल्या इमारतीमध्ये रहिवास करणाऱ्या मालक/भाडेकरु/भोगटवार यांचे वर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ व २६५ नुसार कार्यवाही करण्यात येते.
(२) नाशिक शहराच्या प्रसिध्द प्रारुप सुधारीत विकास आराखड्यासोबत तयार करण्यात आलेल्या विकास नियत्रंण व प्रोत्साहन नियमावलीत जुने नाशिक शहरातील जुन्या वाड्यांच्या पुनर्विकास करण्यासंबंधी तरतुद करण्यात आलेली आहे.
(३) अशाप्रकारे ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या इमारतीचा पुनर्विकास करतांना क्लस्टर डेव्हलपमेंट ही योजना प्रस्तावित केलेली आहे. या योजनेत अधिक चटई क्षेत्र निर्देशांक देऊ करण्यात आलेला आहे. तसेच जास्त क्षेत्रासाठी प्रोत्साहनपर अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देऊ करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंढरपुर (जि.सोलापुर) चंद्रभागा नदीच्या दोन्ही तीरावर घाट बांधणीचा प्रस्ताव

**(२२) ३५१९३ (२१-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपुर (जि.सोलापुर) येथील चंद्रभागा नदीच्या दोन्ही तीरावर घाट बांधणी बाबतचा २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाटबांधणीच्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१६) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर मतदार संघातील म्हारळ, तालुका कल्याण येथील नागरिकांना महानगरपालिकेच्या कचरा डेपोमुळे होणाऱ्या त्रासाबाबत**

**(२३) ३५६४९ (२५-०२-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर मतदार संघातील म्हारळ, तालुका कल्याण येथील महानगरपालिकेच्या कचरा डेपोमुळे इंदिरा नगर, देशमुख नगर, आंबेडकर नगर, रेणुका नगर परिसरातील नागरिकांच्या घरात दुर्गंधीयुक्त घातक व सडक्या कचऱ्याचे घाण पाणी शिरून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचे दिनांक ४/८/२०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामस्थांनी मा. आयुक्त यांची भेट घेतली असता ग्रामस्थांनी ६ महिन्यांचा कालावधी दिला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कचरा डेपोसाठी महानगरपालिकेने दुसरी जागा पाहण्यास विलंब लावण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, शासन तसेच महानगरपालिकेच्या वतीने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) दिनांक ३०.०७.२०१५ रोजी डम्पिंग ग्राऊंड जवळ महानगपालिकेच्या असलेला पाण्याचा पंप व पंप हाऊस येथे पाण्याच्या अतिदाबामुळे नळगळती होऊन सदरचे पाणी पंप हाऊसच्या जवळील नाल्यातून वाहून घाण पाणी डंम्पिग ग्राऊंडच्या खालील परिसरातील नागरीकांच्या घरात शिरले होते.

त्यामुळे तेथील नागरीकांनी दोन दिवस घनकचरा वाहतुकीची वाहने अडवून डंम्पिंग करुन निदर्शने केलेली होती. त्यामुळे शहरात कचरा साचला होता. तद्नंतर पुढील दोन दिवसांत रात्र आणि दिवस पाळीत शहरात साचलेला संपूर्ण कचरा उचलण्यात आला होता व त्या काळात रोगराई पसरली नव्हती.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे विनंती केली असून त्याबाबत पाठपुरावा सुध्दा करण्यात येत आहे.

---

**नागपुर उत्तर विभागातील रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना गत अनेक वर्षापासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत**

**(२४) ३६२२२ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर उत्तर विभागातील रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना गत अनेक वर्षापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासन अधिकारी व स्वयंसेवी संघटनांनी आर्थिक अनियमितता करुन रमाई घरकुल योजनेचा दुरुपयोग केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रमाई घरकुल योजनेकरीता सामाजिक न्याय विभागाकडून आलेला निधी अधिकाऱ्यांचा बेजबाबदार दिरंगाईमुळे विकास कामे न होता तसाच संचित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे एकूण ९९ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत एकूण ६८ लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप झालेले आहे.
(२) हे खरे नाही.
तथापि, सहारा बहुउद्देशिय संस्था, नागपूर या संस्थेने अधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या केल्याची तक्रार असून, त्यानुषंगाने सदर प्रकरणी पाचपावली पोलीस स्टेशन येथे एफआयआर क्र. १३१/१५ दिनांक १७/०४/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढील चौकशी सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
नागपूर शहरातील एकूण ६९१ संभावित लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून या लाभार्थ्यांना टप्पेनिहाय निधीचे वाटप सुरु आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणात वरीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.
(५) विलंब झालेला नसल्याचे प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद नगरपरिषदतंर्गत बांधण्यात येत असलेल्या नाट्यगृहाच्या अपूर्ण कामासाठी निधी मिळणेबाबत

**(२५) ३७९३९ (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद नगरपरिषदतंर्गत बांधण्यात येत असलेल्या नाट्यगृहाच्या अपूर्ण कामासाठी निधी मागणीबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) नाही. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मराठवाडा विकासाचा कार्यक्रम व मराठवाडा विकास सुधारीत कार्यक्राअंतर्गत काम सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुण्यातील कोंढवा येथील व्हीआयआयटी महाविद्यालयापासून कोंढवा बुद्रुक गावठाणात जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ३८८६३ (२२-०१-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील कोंढवा येथील व्हीआयआयटी महाविद्यालय पासून कोंढवा बुद्रुक गावठाणात जाण्यासाठी एक रस्ता आहे. हा रस्ता तीव्र उताराचा व अरुंद असल्याने येथून वाहनांनी जपून ये-जा करावी लागते. इतक्या धोकादायक रस्त्याला येवून मिळणाऱ्या एका रस्त्याला नुकतीच मंजूरी देण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी पुढे शंभर फुटांवरील एक रस्ता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग २ येथील रस्त्याला नव्याने होणारा रस्ता लोकांच्या मागणी वरुन जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) होय.

कोंढवा बु.स.नं. २, ३ मधून गावठाणात जाणाऱ्या रस्त्याला पर्यायी रस्त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २०५ नुसार मुख्य सभा ठराव क्र. ३९२, दिनांक २४.९.२०१३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. तसेच एमसी/सेक्शन २०५/२७०, दिनांक १९.११.२०१४ अन्वये ऑफिस ऑर्डर पारित करण्यात आली आहे.

(२) होय.

सदर प्रस्तावित कलम २०५ अन्वये आखलेल्या रस्त्यापासून नजिकच गावठाणात जाणारा अस्तित्वातील सुमारे ४.५० मी. रुंदीच्या रसता आहे.

(३) सदर गावठाणात जाणाऱ्या रस्त्यालगत विकास आराखड्यानुसार २४.०० मी. डी.पी. रस्त्यास नव्याने आखण्यात आलेला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २०५ नुसारचा रस्ता जोडण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईच्या आरे कॉलनीतील आदिवासी पाड्यांना प्राथमिक सुविधा पुरविण्याबाबत

**(२७) ३८९२९ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या आरे कॉलनीत २७ आदिवासी पाडे असून सुमारे ४ हजाराची लोकवस्ती असलेल्या पाडयामध्ये नळजोडणी करण्यासाठी सन १९९५ पूर्वीचे पुरावे सादर करण्यास आदिवासींना शक्य न झाल्यामुळे वर्षानुवर्षे आदिवासी पाडे पाण्यापासून वंचित असून २-३ किलोमीटरवरील कुपनलिकेचे पाणी प्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाड्यांत प्रामुख्याने पाणी पुरविण्याच्या दृष्टीने तसेच इतर पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) आरे वसाहत येथील आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देण्यासाठी सन १९९५ च्या पूर्वीचे पुराव सादर करण्याबाबतची अट शिथिल करण्यात आली आहे.

आरे वसाहत येथील २७ आदिवासी पाड्यापैकी २० आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तथापि, या २० पाड्यापैकी एक आदिवासी पाडा खुपच उंचवार असल्यामुळे तेथे पाणी पुरवठा करण्यासाठी काहीतांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे तेथे महानगरपालिकेच्या टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

उर्वरित ७ आदिवासी पाड्यांत पाणी पुरवठा सुरु झालेला नसून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

- ३ पाड्यांच्या ठिकाणी चित्रनगरी व २ पाड्यांच्या ठिकाणी फोर्स-वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर पाणी पुरवठा करण्यात येईल.
- एक आदिवासी पाड्याला जलजोडणीसाठी परवानगी प्रपत्र देण्यात आले आहे.
- तसेच एक आदिवासी पाड्याकडून जललोडणीसाठी अर्ज प्राप्त झालेला नाही.

महानगरपालिकेच्या उपलब्ध निधीतून यापूर्वी पायवाटा, शौचालय, समाजमंदिर, शेड, साफसफाई इत्यादी सोयीसुविधा आरे प्रशासनामार्फत ना-हरकत प्रमाणपत्रासापेक्ष वेळोवेळी पुरविण्यात आलेल्या आहेत.

सन २०१५-१६ करिता महानगरपालिकेतर्फे निधीची तरतूद करण्यात आली असून आरे प्रशासनामार्फत अद्यात ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दारव्हा नगरपरिषद (जि.यवतमाळ) मधील गैरकारभाराबाबत**

**(२८) ३८९५७ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहाव्या वेतन आयोगाची थकीत रक्कम शासन नियमानुसार नगरपरिषद फंडातून देणे आवश्यक असताना तसेच १३ व्या वित्त आयोगामधूनही देण्यासंबंधी शासनाचे कोणतेही आदेश नसताना तसेच नगराध्यक्ष, दारव्हा नगरपरिषद यांच्या उपरोक्ष सुमारे ७० लाख ५१ हजार ४६४ रुपये इतकी थकबाकीची रक्कम मुख्याधिकारी, दारव्हा नगरपरिषद यांनी वाटल्याचे दिनांक ५ मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नगराध्यक्षांच्या निदर्शनास आल्याचे, नगराध्यक्ष यांनी मा.नगरविकास राज्यमंत्री यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दारव्हा नगरपरिषदेतील निवृत्ती वेतन धारकांचे माहे-फेब्रुवारी व मार्च, २०१५ या २ महिन्याचे थकित वेतन असताना फेब्रुवारी, २०१५ चे निवृत्तीवेतन रोखीने देऊन त्यातून

१० टक्के रक्कम रोखपाल यांनी मंत्रालयातील संबंधितांना देण्याकरिता काढून घेतली असल्याचे तक्रार, नगराध्यक्ष, दारव्हा नगरपरिषद यांचेकडे पेन्सनर्स असोसिएशनचे अध्यक्ष यांनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) या प्रकरणी जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी चौकशी केली असून दि. १९/०६/२०१५ च्या पत्रान्वये संबंधित मुख्याधिकारी यांना सक्त ताकीद देऊन यापुढे कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवानिवृत्ती वेतन आणि इतर सर्व लाभ हे रोखीने न देता नियमानुसारच धनादेशानेच अदा करण्याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली नगरपरिषदेमधील झोपडपट्टी भागातील घरांना स्थायी पट्टे देण्याबाबत

**(२९) ३९१५० (२१-०१-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली नगरपरिषदेमध्ये (जि.गडचिरोली) मागील २५ वर्षापासून रामनगर,इंदिरानगर गोकुळनगर विवेकांनद नगर इत्यादी झोपडपट्ट्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपडपट्ट्यांना रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य यासारख्या मूलभूत सोयी-सुविधा मागील अनेक वर्षापासून नगरपरिषदेमार्फत पुरविण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांना अजूनपर्यंत कायमस्वरूपी पट्टे देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडचिरोली नगरपरिषद अंतर्गत असणाऱ्या झोपडपट्टी भागातील घरांच्या स्थायी पट्टेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) नियमानुसार झोपडपट्टी धारकांना कायमस्वरुपी अतिक्रमीत जमिनीचे पट्टे वितरीत करण्यात आले आहेत व उर्वरित अतिक्रमती धारकांना पट्टे वितरित करण्याची कार्यवाही तहसिलदार यांचेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक शहरात विकसित झालेल्या पायाभूत सुविधांची नियमित देखभाल करण्याबाबत

**(३०) ४०७९६ (१७-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील गोदावरी नदीवरील घाट, मैदाने आणि साधुग्रामसह अन्य भूखंडांचे जतन करून त्यांची नियमित देखभाल करणेसाठी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सूचना केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक शहरात विकसित झालेल्या पायाभूत सुविधांची नियमित देखभाल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :**(१) होय.

(२) सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने शहरात विकसित झालेल्या पायाभूत सुविधांची नियमित देखभाल नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापूर महानगरपालिकेला अतिरिक्त अनुदान देण्याबाबत

**(३१) ४१०१७ (०४-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने स्थानिक संस्था करात सवलत दिल्याने कोल्हापूर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे तसेच प्रत्यक्षात १८ कोटी खर्च येत आहे,मात्र शासनाकडून अनुदान ६ कोटीच मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विविध विकासकाम योजना, कर्मचाऱ्यांचे पगार, वीज बिले, पाणी बिले, डीझेल खर्च याचे खर्च प्रलंबित आहे, त्यामुळे शासन स्तरावर अतिरिक्त रु.११ कोटींचे अनुदान मिळण्याबाबत महानगरपालिका शासनाकडे मागणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

- शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून ५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून सूट देण्याचा निर्णय घेतल्यामुळे

महानगरपालिकेंच्या उत्पन्नांमध्ये येणारी तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडून महानगरपालिकांना सहायक अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

- हे सहाय्यक अनुदान देण्यासाठी पुढील प्रमाणे सुत्र ठरविण्यात आले आहे.

(अ) महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील जकातीचे अथवा स्थानिक संस्था करापासूनचे सर्वोच्च उत्पन्न आधारभूत मानून त्यावर दरवर्षी ८% वाढ देणे.

(ब) वरील (अ) प्रमाणे परिगणित केलेल्या सहाय्यक अनुदानाच्या रक्कमेमधून संबंधित महानगरपालिकांना रु. ५०.०० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्याकडून प्राप्त होणारे उत्पन्न व १ % अतिरिक्त मुद्रांक शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न वजा करणे.

- कोल्हापूर महानगरपालिकेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये ऑगस्ट २०१५ ते मार्च २०१६ या ८ महिन्याचा कालावधीमध्ये रु. ५३.४६ कोटी ऐवढे सहाय्यक अनुदान स्थानिक संस्था करापोटी येणार तूट भरुन काढण्यासाठी वितरीत करण्यात आले आहे.

(३) स्थानिक संस्था करातून सूट दिल्यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नात येणारी तूट भरुन काढण्यासाठी वरील प्रमाणे सुत्रानुसार सहाय्यक अनुदानाचे वाटप करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार यांच्यावर वाळू माफियांनी केलेल्या प्राणघातक हल्याबाबत

**(३२) ४१४९४ (२४-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील पंढरपूर कुर्डुवाडी मार्गावर सोलापूरचे जिल्हाधिकारी श्री. मुंढे यांनी वाळूचा ट्रक अडवला असता त्यांच्या अंगावर ट्रक घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात केला, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर ठिकाणी बेकायदेशीर वाळू वाहतुक करणाऱ्या डंपरचा पाठलाग करणाऱ्या तहसिलदार यांच्यावर वाळू माफियांनी दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास डंपर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अंती वाळू माफीयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.
(४) जिल्हाधिकारी, सोलापूर यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत कुर्डुवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१६/२०१६ भा.द.वि. कलम ३०७, ३५३ ३७९, १८६ पर्यावरण अधिनियम कलम ९ व १५ प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक केली असून सध्या तो जमिनावर मुक्त आहे. तसेच गुन्ह्यातील ट्रक वाळुसह जप्त केला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तहसिलदार यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत कुर्डुवाडी पोलीस ठाणे येथे दि.२०.१२.२०१५ रोजी गु.रं.क्र. २०८/१५ भा.द.वि. कलम ३५३, ३७९, ३४ पर्यावरण अधि. कलम ९ व १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या ते जमिनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्यावेळी वापरण्यात आलेले डंपर, एक स्कॉर्पीओ गाडी, तसेच चोरीची वाळू जप्त करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील गोदावरी नदीतील प्रदूषणाबाबत**

**(३३) ४१५४७ (१३-०५-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील कुंभमेळयानंतर पुन्हा एकदा गोदावरीच्या प्रदूषणाचा विषय ऐरणीवर आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी नदीचे प्रदूषण रोखून स्वच्छतेचा उपाय म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) गोदावरी नदीच्या प्रदूषण मुक्तीसाठी नाशिक महानगरालिका विविध उपाययोजना करत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अनुदानात**
**२० कोटी रुपयांची कपात केली असल्याबाबत**

**(३४) ४२०७३ (०५-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक संस्था करापोटी (एलबीटी) दर महिन्याला महानगरपालिकेला देण्यात येणारे अनुदान कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अनुदानात २० कोटी रुपयांची कपात केली असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अन्य महानगरपालिकांच्या अनुदानात वाढ केली मात्र पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अनुदानात कपात केली असल्याने शासनाने यामध्ये तफावत करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अन्य महानगरपालिकांप्रमाणे पुणे-पिंपरी महानगरपालिकेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासन पुनर्विचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

- शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून ५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून सूट देण्याचा निर्णय घेतल्यामुळे महानगरपालिकोंच्या उत्पन्नांमध्ये येणारी तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडून महानगरपालिकांना सहायक अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
- हे सहाय्यक अनुदान देण्यासाठी पुढील प्रमाणे सुत्र ठरविण्यात आले आहे.

(अ) महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील जकातीचे अथवा स्थानिक संस्था करापासूनचे सर्वोच्च उत्पन्न आधारभूत मानून त्यावर दरवर्षी ८% वाढ देणे.

(ब) वरील (अ) प्रमाणे परिगणित केलेल्या सहाय्यक अनुदानाच्या रक्कमेमधून संबंधित महानगरपालिकांना रु. ५०.०० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्याकडून प्राप्त होणारे उत्पन्न व १ % अतिरिक्त मुद्रांक शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न वजा करणे.

- पुणे महानगरपालिकेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये ऑगस्ट ते मार्च २०१६ या ८ महिन्याचा कालावधीमध्ये रु. ५७७.४० कोटी तर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस रु. ४५८.८१ कोटी ऐवढे सहाय्यक अनुदान स्थानिक संस्था करापोटी येणार तूट भरुन काढण्यासाठी वितरीत करण्यात आले आहे.

(३) स्थानिक संस्था करातून सूट दिल्यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नात येणारी तूट भरुन काढण्यासाठी वरील प्रमाणे सुत्रानुसार सहाय्यक अनुदानाचे वाटप करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोसरे-घाटणे व लऊळ (जि.पुणे) हद्दीत तहसिलदारांच्या अंगावर वाळूमाफियांनी गाडी घालण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(३५) ४२५०२ (१६-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरे-घाटणे व लऊळ (जि.पुणे) हद्दीत (क्र.एमएच ०९ सीएटी १००४) हा वाळूचा ट्रक बायपासवरुन माढा रोडकडे जात असतांना तहसिलदार श्री. रमेश शेडगे व चालक श्री.अतुल दहिळणकर यांनी सदर ट्रकची तपासणी केली असता वाळू माफियांनी त्यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. परंतू, सदर घटना ही दिनांक १९.१२.२०१५ रोजी सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत घडली आहे.
(२) सदर प्रकरणी कुर्डुवाडी पालीस ठाणे येथे दि.२०.१२.२०१५ रोजी गु.र.क्र. २०८/१५ भा.द.वि. कलम ३५३, ३७९, ३४, ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या ते जमिनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्यावेळी वापरण्यात आलेले डंपर, एक स्कॉपर्रओ गाडी, तसेच चोरीची वाळू जप्त करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरात बालगुन्हेगारीला आळा घालण्याबाबत**

**(३६) ४२५७४ (१७-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात गत वर्षी जबरी चोरी, विनयभंग इत्यादी गुन्ह्यांमध्ये बालगुन्हेगारांचा सहभाग अनुक्रमे ५०१ आणि ५०२ असल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील बालगुन्हेगारीला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) नाही.
पुणे शहरामध्ये सन २०१४ मध्ये जबरी चोरीच्या गुन्ह्यात २९ व विनयभंगाचे गुन्ह्यात ३६ विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच माहे जानेवारी, २०१५ ते नोव्हेंबर, २०१५ या कालावीत जबरी चोरीच्या गुन्ह्यात ६१ व विनयभंग गुन्ह्यात ३३ विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.
(२) बालगुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- विशेष पोलीस बाल पथक स्थापीत.

- सदर पथक पालकांना व मुलांना शिक्षणाचे महत्व, शाळेत पाठविण्याबाबत व मुले वाईट संगतीत जाणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत समुपदेशन करते.

- बाल कामगार अधिनियम व मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी.

- रिमांड होममधील बालके पुन्हा गुन्हेगारीकडे वळणार नाहीत याकरिता समुपदेशन करण्यासाठी रिमांड होमला भेट.

- अशासकीय संस्था व स्वयंसेवी संस्थाचे मदतीने व्यसनामुळे बाल गुन्हेगारांचे प्रमाण वाढू नये म्हणून झोपडपट्टी भागात समुपदेशन करुन दुष्परिणामाबाबत माहिती देण्यात येते.

- गुन्हेगारीमध्ये गेलेल्या बालकांबाबत माहिती पुरवावी असे प्रसिध्दी माध्यमाद्वारे कळविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुरगाणा (जि.नाशिक) येथील ठेकेदाराने पत्रकारावर केलेल्या प्राणघातक हल्याबाबत**

**(३७) ४३६८७ (१७-०५-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) येथील पत्रकाराने ठेकेदार निकृष्ठ प्रतिची कामे करित असल्याचे निदर्शनास आणल्याने ठेकेदाराने पत्रकारावर प्राणघातक हल्ला केल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पातूर (जि. अकोला) येथे गोवशांची हत्या सुरु असल्याबाबत**

**(३८) ४५६०३ (१७-०५-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू केला असतानाही अकोला जिल्ह्यात पातूर येथे गोवशांची सर्रास हत्या सुरु असून नागरिकांच्या लेखी तक्रारीनंतरही जिल्हा प्रशासन तथा पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोवंशा हत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) याबाबत सन २०१५ मध्ये ३९ गुन्हे नोंदवून ५६ आरोपीविरुध्द कारवाई करण्यात आली. तसेच एप्रिल, २०१६ पर्यंत एकूण १२ गुन्ह्यांची नोंद झाली असून २९ आरोपींना अटक करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेच्या १९८ वाहनांसाठी गेल्या तीन वर्षात पाच कोटी पंधरा लाख रुपयांचे इंधन वापरल्याबाबत**

**(३९) ४५८३३ (०३-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या १९८ वाहनांनी गेल्या तीन वर्षात पाच कोटी पंधरा लाख रुपयांचे इंधन वापरले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे इंधनाचा मर्यादित वापर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
नाशिक महानगरपालिकेकडे असलेल्या विविध वाहने व जनरेटर सेट इत्यादीसाठी मागील तीन वर्षात रुपये ५१५.१४ लक्ष इतकी खर्च इंधनावर झाला आहे.
(२) इंधनाचा मर्यादित वापर होण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे उपाययोजना महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

- वाहनांचा गरजेनुसार वापर करणे
  १२ वर्षापेक्षा जास्त जुन्या वाहनांचा वापर बंद करुन कमी इंधन लागणारी वाहने घेणे.
- विविध पाणीपुरवठा व इतर केंद्रावरील डिझेल जनरेटरचा वापर कमी करण्यासाठी सदर केंद्राना एक्सप्रेस फिडर मार्फत वीज पुरवठा करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) येथील फटाक्याच्या दुकानांना आग लागल्याबाबत**

**(४०) ४६५९५ (२०-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील फटाक्याच्या सोळा दुकानास माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आग लागल्यामुळे सुमारे ५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत सुमारे सात ते आठ दुचाकी वाहने जळून खाक झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आगी संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) दि.९.११.२०१५ रोजी दिपावली उत्सवाच्या निर्मित्ताने लावण्यात आलेल्या फटाक्याच्या दुकानास आग लागून अंदाजे रु.६८,१८,९००/- चे नुकसान झाले आहे.

(२) सदर घटनेत ५ मोटार सायकल, एक ॲपे रिक्षा व एक लुना आणि दुकानातील साहित्य व फटाके जळाले आहेत.

(३) सदर घटनेप्रकरणी मुखेड पोलीस ठाणे येथे अकस्मात जळीत प्रकरण क्र.१/२०१५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी केलेल्या चौकशीत कोणताही घातपाताचा किंवा गुन्ह्याचा प्रकार दिसून आलेला नाही. तसेच, आगीबाबत कोणीही संशय किंवा तक्रार दाखल केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटंजी (ता.घाटंजी जि.यवतमाळ) येथील नगर परिषदेच्या कारभाराबाबत**

**(४१) ४६५९८ (१९-०५-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (ता.घाटंजी जि.यवतमाळ) येथील नगर परिषदेचा कारभार संथ गतीने चालला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर परिषद मुख्याधिकारी व अभियंता सतत गैरहजर असल्याने शहरात अवैध बांधकाम वाढत असून सर्व सामान्य नागरिकांना इतर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरिष्ठांच्या गैरहजेरीने नगर परिषदेची आर्थिक स्थिती कमकुवत झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरपरिषदेचा व्यवहार व्यवस्थित चालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सबंधित गैरहजर कर्मचा-यांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. मुख्याधिकारी नगर परिषद घाटंजी या काही वैयक्तिक कारणासाठी रजेवर होत्या. मात्र त्या काळात त्यांच्या पदाचा कार्यभार जिल्हा प्रशासन अधिकारी नगर परिषद प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ व नायब तहसिलदार घाटंजी यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तसेच बांधकाम अभियंता कार्यालयीन कामकाजाव्यतिरिक्त कार्यालयात गैर हजर असल्याचे नगर परिषद कार्यालयातील हजेरी पटावरुन दिसून येत नाही.
(२) नाही. बांधकाम अभियंता यांची इतरत्र बदली करण्यात आली असून त्यांच्या पदाचा कार्यभार बांधंकाम अभियंता नगर परिषद उमरखेड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.
(३) व (४) हे खरे नाही. घाटंजी शहरातील अवैध बांधकामावर आळा घालण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असून सर्वसामान्य नागरीकांना कोणत्याही समस्यांना सामोरे जावे लागणार नाही व नगर परिषदेतील आर्थिक परिस्थिती कमकुवत होणार नाही याची काळजी घेतली जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धनेगांव (जि.नांदेड) येथील दुचाकीस्वारची ट्रॅक्टरशी धडक झाल्यामुळे तीन जण जागीच ठार झाल्याबाबत**

**(४२) ४६६५० (२०-०४-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनेगांव (जि.नांदेड) येथील दुचाकीस्वार तरुणांची ट्रॅक्टरशी धडक झाल्यामुळे तीन जण जागीच ठार झाल्याची घटना नुकतीच माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) आरोपी ट्रॅक्टर चालकास अटक करण्यात येऊन त्याचेविरुध्द नांदेड (ग्रामीण) पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३०६/२०१५, भा.द.वि.सं. कलम २७९, ३०४(अ), ४२७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच, आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील तंटामुक्त गाव मोहिम बंद होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(४३) ४८०५४ (२४-०५-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंटामुक्त गाव मोहिम बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात तंटामुक्त गाव मोहिमेतून २७ हजार ग्राम पंचायतीं पैकी १७ हजार ७४५ गावे तंटामुक्त झाल्यामुळे या मोहिमेच्या पुरस्कारातून अनेक गावांचा विकास झाला असून नक्षल चळवळीलाही आळा बसला असल्यामुळे राज्यातील तंटामुक्त गाव मोहिम सुरू रहावी म्हणून शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नगरपरिषद रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(४४) ४८२०३ (१३-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदेच्या रोजंदारी कर्मचा-यांना सेवेत कायम करण्याबाबतची मागणी राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये शासनाकडे निवेदनांद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभाग, सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळातील रोजंदारी मजुरांना दिनांक १६ आक्टोंबर २०१२ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत कायम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कर्मचा-यांना प्रश्न भाग (२) च्या धर्तीवर कायम करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नव्याने स्थापन करण्यात आलेल्या नगरपरिषदा, नगरपंचायतीमध्ये रोजंदारी कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापुर (जि.अकोला) येथील बजरंग दलाचे शहरप्रमुख निलेश चावरिया यांच्यावर समाजकंटकांनी प्राणघातक हल्ला केल्याबाबत**

**(४५) ४९१६६ (१७-०५-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापुर (जि.अकोला) येथील बजरंग दलाचे शहरप्रमुख निलेश चावरिया यांच्यावर समाजकंटकांनी प्राणघातक हल्ला करुन त्यांचा खुन करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस स्टेशनमधील ठाणेदार श्री.मिर्झा हे सदर समाजकंटकावर कारवाई न करता त्यांना पाठीशी घालत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समाजकंटकावर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या ठाणेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) श्री.निलेश चावरिया यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची बाब खरी आहे. परंतु त्यांच्यावर समाजकंटकांनी हल्ला केलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी तात्काळ बाळापूर पोलीस स्टेशन येथे अप क्र.३५/२०१६ कलम ३०७, ३४ भादवि सह कलम ३(२)(V) अजाजअअ प्र.का. सह कलम ३,४/२५ आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली असून सध्या आरोपी जमिनावर मुक्त आहे. आरोपीविरुध्द प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे. सध्य:स्थितीत मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशोदा नगरातील (जि.भंडारा) खात मार्गावरील १५ फुट लांबीच्या पुलाचे दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४६) ४९३९६ (०५-०५-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशोदा नगरातील (जि.भंडारा) खात मार्गावरील यशोदा नगरातील १५ फुट लांबीच्या पुलाचे दुरुस्तीचे काम नगर परिषदेने हाती घेतले व त्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने सदर पुल कोसळण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या दुरुस्तीच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारांवर व दुर्लक्ष करणाऱ्या नगरपरिषदेतील अधिकारी यांच्यावर शासन कोणती कारवाई केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१), (२) व (३) यशोदा नगर येथील स्लॅब कलव्हर्टचे काम खाजगी ले- आऊट धारक यांनी ले-आऊटमध्ये नागरीकांच्या जाण्याकरीता सोय म्हणून अंजदाने १० ते १२ वर्षापूर्वी खाजगीरित्या पूर्ण केले होते. पाण्याच्या प्रवाहामुळे नालीच्या तळाचा काही भाग वाहून जाण्याची शक्यता विचारात घेउन नगर परिषदेने स्लॅब कलव्हर्टच्या दुरुस्तीचे काम पूर्ण केल असून सद्या पूल कोसळण्याच्या स्थितीत नाही. साईट रेलिंगसाठी उभारण्यात आलेल्या ४ साईड गार्ड पिल्लरपैकी एका पिल्लीरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. नगर परिषदेने कंत्राट दारास सूचना दिलेली आहे. सदर काम त्वरीत पूर्ण करण्यात येईल असे नगर परिषदेने नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील रस्ते अपघातात ३७१ लोकांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४७) ५०२६२ (१६-०५-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यात साडेतीन वर्षात नादुरुस्त वाहने, वाहतूक नियमांचे उल्लंघन, मद्यपान करुन वाहने चालविणे इ. विविध कारणाने रस्ते अपघातात ३७१ मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अपघात टाळण्याकरीता वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येते. सन २०१२ ते सप्टेंबर, २०१५ अखेर भरधाव वाहने चालविणाऱ्या ३३९, मद्य प्राशन करुन वाहन चालविणाऱ्या २४२ आणि रॉंग साईड ड्रायव्हिंग करणाऱ्या ५९१ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, नादुरुस्त रस्ते दुरुस्त करण्यासाठी, अपघातप्रवण स्थळी सूचना फलक लावण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चेंबूर (मुंबई) येथील म्हाडा वसाहतीमधील इमारतींचे पुनर्विकासाचे काम बंद असल्याबाबत**

**(४८) ५०७५५ (१७-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुभाषनगर, चेंबूर (मुंबई) येथील म्हाडा वसाहतीमधील काही इमारतींचे सुरु झालेले पुनर्विकासाचे काम सध्या बंद पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर म्हाडा वसाहतीचे पुनर्विकास कामासंबधात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी मा.गृहनिर्माण मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२१-०६-२०१६) :**(१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवाल पाहता हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाच्या दि. २५.२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रोराटा क्षेत्रफळाच्या वितरणावरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव (जि.यवतमाळ) पोलीस ठाण्याअंतर्गत मौजा. फुलसावंगी येथील व्यापाऱ्याकडे दरोडा पडल्याबाबत**

**(४९) ५१८३६ (२४-०५-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) पोलीस ठाण्याअंतर्गत मौजा. फुलसावंगी येथील व्यापारी संदेश मुत्तेपवार यांच्याकडे दिनांक ०८ जानेवारी, २०१६ रोजी २७ लक्ष रुपयांचा दरोडा पडला असून तपास करण्यात पोलिसांना अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

महागाव जिल्हा यवतमाळ पोलीस ठाणे अंतर्गत मौजा फुलसावंगी येथील व्यापारी श्री.संदेश मुत्तेपवार यांचे घरी दि. ८ जाने, २०१६ रोजी झालेल्या २७ लाख रुपयाचा घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलीसांना यश आले असून गुन्ह्यातील ४ आरोपीना अटक करुन त्यांचे जवळून गुन्ह्यातील रु ४,६२,५००/- रोख व गुन्ह्यात वापरलेली इंडीका कार कि. रु.१,५०,०००/- असा एकूण रु. ६,१२,५००/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी श्री.संदेश संजय मुत्तेपवार यांचे फिर्यादी वरुन पो.स्टे. महागाव येथे गुन्हा रजिस्टर क्र. १२/१६ कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदवून तपास करण्यात आला आहे. गुन्हा उघडकीस आणुन गुन्ह्यातील ४ आरोपीना अटक करुन त्यांचा पोलीस कोठडी रिमांड घेऊन त्यांनी दिलेल्या कबुली प्रमाणे गुन्ह्यातील रु.४,६२,५००/- रोख व गुन्ह्यात वापरलेली इंडीका कार कि. रु.१,५०,०००/- असा एकूण रु. ६,१२,५००/- चा माल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दि. २२.३.२०१६ अन्वये मा.न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालयात, महागाव येथे दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क न्यायालयाची स्थापना करण्याबाबत**

**(५०) ५२३७८ (२०-०५-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार सन २००१ मध्ये अधिसूचना जारी करुन प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क न्यायालयाची स्थापना करण्याची केलेली सूचना १५ वर्षानंतरही अंमलात आलेली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वसामान्य नागरीकांच्या मानवी हक्कावर गदा येऊन नये यासाठी शासनाने निर्णय घेऊन सदर न्यायालये जिल्हावार स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) सदर अधिसूचना दि.३०/०५/२००१ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे.
(२) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ अन्वये दाखल प्रकरणे निकाली काढण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांतील “सत्र न्यायालय” हे “मानवी हक्क न्यायालय” म्हणून सदर अधिसूचनेन्वये विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.